पुढारी



शिवाजी विद्यापीठातून...

# गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी अचूक आराखडा आवश्यक : प्रा. गुरव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आजच्या स्पर्धात्मक वातावरणात ज्ञानाच्या कक्षा विस्तारत आहेत. ज्ञानाच्या कक्षा विस्तारीत करण्यामध्ये संशोधकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. संशोधन क्षेत्रात नव्याने पदार्पण करणाऱ्या नवसंशोधकांनी संशोधनाचा संशोधनपूर्व आराखडा अचूकपणे कसा करता येईल यासाठी प्रयत्नशील रहावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे एम.फिल. पीएच. डी. संशोधन आराखडानिर्मिती कार्यशाळेत ते बोलत होते.

डॉ. गुरव म्हणाले, संशोधन आराखडा संशोधनाचा पाया असतो. तो अधिकाधिक भक्कम कसा करता येईल यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. पहिल्या सत्रात प्रा. डॉ. एस. एस. कोळेकर यांनी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी संशोधन आराखडा कसा तयार करावा याबाबत मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी सामाजिक शास्त्रे व आंतरविद्याशाखा विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रामध्ये डॉ. केदार मारुलकर यांनी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांनी आभार मानले.

पुढारी

# उच्च शिक्षणात आत्मनिर्भरतेसह आत्मविश्वास महत्त्वाचा

## डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उच्च शिक्षणामध्ये आत्मनिर्भरतेबरोबरच आत्मविश्वास महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रातील समावेशी शिक्षण संसाधन केंद्र व निवांत फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ब्रेल दिनानिमित्त 'आत्मनिर्भरतेच्या वाटेवर' एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा झाली.

कार्यशाळेत अंध विद्यार्थ्यांना लेखनिक न घेता परीक्षा देण्यास सोयीस्कर अशा 'स्वलेखन ॲप' बद्दल प्रात्यक्षिकासह सादरीकरण करण्यात आले. नीता मुंद्रा यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देणारे उद्योग, तर वंदना गांधी, जयश्री ठकार यांनी अंध विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा देण्यासाठी उपयुक्त विषयांची माहिती दिली. निवांत फाऊंडेशनच्या संचालिका मीरा बडवे, अमित देवकुळे यांनी इंग्रजी कम्युनिकेशन विषयावर मार्गदर्शन केले. संग्राम किल्लेदार यांनी सूत्रसंचालन केले. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत यांनी प्रास्ताविक केले. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राचे उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी आभार मानले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे जी. आर. पळसे, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. एस. व्ही. थोरात आदी उपस्थित होते.

**तरुण भारत**

# विद्यापीठातर्फे संगीत-नाटक महोत्सव

कोल्हापूर : ब्रम्हसाम्राज्यदीपिका" या ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हा ग्रंथ आळंदी येथील ज्ञानेश्वर माऊलीच्या समाधीस्थळ येथे साधू-संतांमध्ये राहून प्रा. कृष्णा गुरव यांनी लिहिला आहे.

या ग्रंथाच्या लेखनासाठी त्यांचे गुरूवर्य प्राचार्य नि. ना. रेळेकर यांचे मार्गदर्शन लाभले. हा ग्रंथ तीनशे अठरा पानांचा असून, ५८ साधनापत्रे आहेत. ज्ञानेश्वरांचे जन्मस्थळ, जन्मशक याबद्दलच्या संशोधनाचा वृत्तांत परिशिष्टामध्ये दिला आहे. ग्रंथाचे चाररंगी पृष्ठ-मलपृष्ठ अतिशय देखणे असून, उत्कृष्ट छपाई व पुठ्ठाबांधणीमुळे हा ग्रंथ सर्वांगसुंदर झालेला आहे.